**नियमित दिवाणी दावा क्र. ४५१/२०२२**

(सतीश काशिद वि. रविंद्र बनकर व इतर)

**CNR No.MHSO07-000574-2022**

## निशाणी क्र. ३४ खालील आदेश

**१.** वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ याचेविरुध्द दावा अबेट झाल्याचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ राजकुमार बनकर हे दि.१६.०९.२०२२ रोजी मयत झाले असून १७ दिवसांचा विलंब झालेला आहे, वादीस आर्थिक व घरगुती अडचणीस्तव त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणता आले नाहीत, त्यामुळे प्रतिवादी क्र.२ विरुध्द दावा अबेट झाला आहे. करीता सदर अबेटमेंट आदेश रद्द करुन मिळणेसाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकार्डवर घेणे उचित ठरते. परंतु तत्पुर्वी अबेटमेंट आदेश रद्द करणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ३००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादीला पुढील तारखेपर्यंत दयावी.

३. वादीने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर वादीविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा.

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.08.31 16:37:02 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– ३१.०८.२०२४ ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पंढरपूर.

**नियमित दिवाणी दावा क्र. ४५१/२०२२**

(सतीश काशिद वि. रविंद्र बनकर व इतर)

CNR No.MHSO07-000574-2022

## निशाणी क्र. ३६ खालील आदेश

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेला विलंब माफ होऊन मिळणे करीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ राजकुमार बनकर हे दि.१६/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी १७ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा अधिकार असल्यामुळे सदरचा विलंब माफ करुन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादींनी सदर अर्जाला म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकार्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकार्डवर घेणे उचित ठरते. परंतु तत्पुर्वी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला १७ दिवसांचा विलंब माफ करणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

PRIYANKA NAMADEV PATHADE
Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE Date: 2024.08.31 16:37:11 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः- ३१.०८.२०२४ ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर.

**नियमित दिवाणी दावा क्र. ४५१/२०२२**

(सतीश काशिद वि. रविंद्र बनकर व इतर)

CNR No.MHSO07-000574-2022

## <u>निशाणी क्र. ३८ खालील आदेश</u>

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ हे दि.१६.०९.२०२२ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर दाखल असणे जरुरीचे व आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घ्यावे अशी त्याने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणे उचित ठरते. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने प्रतिवादी क्र.२ च्या वारसांची नोंद करणेबाबत दाव्यात योग्य ती दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी. |
| ३. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत दाखल केल्यानंतर प्रतिवादींना जादा कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.08.31 16:37:17 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– ३१.०८.२०२४

६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. M. Gaddam |
| Court | - | 6th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 31.08.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 31.08.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 31.08.2024 |